# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०५** दिनांक :-१८ /०८/२०११

ठराव क्रमांक :- ११५

विषय क्रमांक :- १ (ज)

---

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.सुभाष दरिबा गोयकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या वॉर्ड क्र.१३ मध्ये मनपा प्राथमिक शाळा क्र.४२ आहे. सदर शाळेच्या दोन खोल्या बऱ्याच वर्षापूर्वी पत्राच्या कच्च्या बांधकामाच्या असल्यामुळे सदर खोल्यांची पडझड झाली असून, खुपच दुरावस्था झाली आहे. सद्या पावसाळ्याचे दिवस असल्याने सदरच्या निकृष्ठ दर्जाच्या खोल्या केंव्हाही पडण्याची शक्यता असून, त्यामुळे शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी कोणाच्याही जिवितास धोका होणार यादृष्टीने सदरच्या निकृष्ठ दर्जाच्या असलेल्या खोल्या पाडून सदर ठिकाणी नव्याने खोल्या बांधणेकामी प्रस्तावाने मागणी केली आहे. सन्मा.सदस्यांनी प्रस्तावात नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेवून, महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.१३ मधील मनपा प्राथमिक शाळा क्र.४२ च्या विषयांकीत खोल्या पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kenrov

अनुमोदक :- [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

**महापौर.**

प्रशासन अधिकारी, प्रा. शि. मंडळ.
मा. आयुक्तसो यांचे निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही व्हावी.

[signature]

**महापालिका सचिव**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका